पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. क्रीडा समिती
कार्यपत्रिका क्रमांक - १३

**सभावृत्तांत**

दिनांक - **१८/०३/२०१५** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **१८/०३/२०१५** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा. ननवरे जितेंद्र बाबा - सभापती**
**२)** मा. तानाजी विठ्ठल खाडे
**३)** मा. लोंढे शुभांगी संतोष
**४)** मा. सुपे आशा रविंद्र
**५)** मा. सौ.साळुंके सविता सुरेश
**६)** मा. गिता सुशिल मंचरकर

या शिवाय मा.पवार - कार्यालय अधिक्षक, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.२ – महिला व्यायामशाळेकरीता साहित्य उपलब्ध करुन देणेबाबत – मा.सविता साळुंके, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३ – क्रीडा समिती सदस्य, क्रीडा अधिकारी, क्रीडा पत्रकार यांच्या अभ्यास दौ-याबाबत – मा.तानाजी खाडे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४ – राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय खेळाडूंची छायाचित्रे लावणे / क्रीडा साहित्य खरेदी करणेबाबत – मा.तानाजी खाडे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५ – लॉन टेनिस अकादमी सुरु करणेबाबत – मा.तानाजी खाडे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६ – हॉकी अकादमी सुरु करणेबाबत – मा.तानाजी खाडे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७ – शुटींग अकादमी सुरु करणेबाबत – मा.तानाजी खाडे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८ – बॅडमिंटन अकादमी सुरु करणेबाबत – मा.तानाजी खाडे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९ – हॉकी प्रशिक्षक म्हणून मानधनावर नेमणूक करणेबाबत – मा.तानाजी खाडे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१० – तीन ब्लेझरची खरेदी करणेबाबत – मा.तानाजी खाडे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक : मा.तानाजी खाडे अनुमोदक : मा.आशा सुपे

दिनांक १८/०३/२०१५ ची क्रीडा समिती पाक्षिक सभा बुधवार दिनांक २५/०३/२०१५ रोजी दुपारी २.०० वा.पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभपती -** बुधवार दिनांक २५/०३/२०१५ रोजी दुपारी २.०० वा.पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( **ननवरे जितेंद्र बाबा** )
**सभापती**
क्रीडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. क्रीडा समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १३

**सभावृत्तांत**

( दिनांक १८/०३/२०१५ ची तहकूब सभा )

दिनांक - **२५/०३/२०१५** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा समितीची दिनांक १८/०३/२०१५ ची तहकूब सभा बुधवार दिनांक **२५/०३/२०१५** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१) मा. ननवरे जितेंद्र बाबा - सभापती**
२) मा. तानाजी विठ्ठल खाडे
**३)** मा. लोंढे शुभांगी संतोष
४) मा. सुपे आशा रविंद्र
५) मा. सौ.साळुंके सविता सुरेश
**६)** मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
**७)** मा. बारणे निलेश हिरामण

या शिवाय मा.फुंदे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.बेंडे – प्रशासन अधिकारी, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

अ) दिनांक १८/०२/२०१५ व ०४/०३/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.११)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक ०४/०३/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्र.१२)** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ७९ विषय क्रमांक - १

दिनांक - २५/०३/२०१५

सुचक - मा.सविता साळुंके अनुमोदक – मा.सुरेश म्हेत्रे

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/२४५/२०१५, दि.०७/०३/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री रमेश विपट ,कार्याध्यक्ष ,पुना डीस्ट्रीक्ट इंटर ऑफिसेस स्पोर्टस असोसिएशन पुणे ४११००२ यांनी पत्र क्र.पी.डी.आय.ओ.एस.आर./खेळ/३१/२०१४ दि.११/२/२०१५ अन्वये पुना डीस्ट्रीक्ट इंटर ऑफिसेस स्पोर्टस असोसिएशन यांना यांच्या खालील स्पर्धांना आर्थिक पुरस्कार मिळणेस व सदर र.रु.१,०१,३००/-चा धनादेश लवकरात लवकर मिळणे कामी कळविलेले आहे..

| अ.क्र. | खेळ स्पर्धेचे नाव | आर्थिक पुरस्कार र.रु. |
|---|---|---|
| १ | कबड्डी | १४,७००/- |
| २ | कॅरम(पुरुष), | २२,३००/- |
| ३ | कॅरम (महिला), | १५,०००/- |
| ४ | फुटबॉल | २४,३००/- |
| ५ | लॉन टेनिस | २५,०००/- |
| | **एकूण र.रु.** | **१,०१,३००/-** |

पिंपरी चिंचवड म.न.पा.ने सन २०१३-१४ मध्ये आदेश क्र.क्रीडा/७/कावि/१५८/२०१४ दि.४/२/२०१४ अन्वये कार्याध्यक्ष ,पुना डीस्ट्रीक्ट इंटरऑफिसेस स्पोर्टस असोसिएशन पुणे ४११००२ यांना फुटबॉल ,कॅरम (महिला),कॅरम(पुरुष),जलतरण लॉन टेनिस या स्पर्धेसाठी म.न.पा.च्या वतीने आर्थिक पुरस्कार देणेकामी आर्थिक सहाय्य र.रु. ८८,१००/- अदा केलेले आहे.या स्पर्धेमध्ये म.न.पा.अधिकारी व कर्मचारी सहभागी होत असतात.

तरी कार्याध्यक्ष ,पुना डीस्ट्रीक्ट इंटरऑफिसेस स्पोर्टस असोसिएशन पुणे ४११००२ यांना १)कबड्डी,२)कॅरम(पुरुष), ३)कॅरम (महिला), ४) फुटबॉल ,५)लॉन टेनिस या ५ क्रीडा स्पर्धांना सन २०१४-१५ करिता म.न.पा.च्या वतीने आर्थिक पुरस्कार देणेकामी ,आर्थिक सहाय्य र.रु.१,०१,३००/- ( अक्षरी र.रु.एक लाख एक हजार तिनशे फक्त ) अदा करणेस व सदरचा खर्च ,क्रीडा निधी ,वार्षिक स्पर्धा क्रीडा कला या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करणेत आलेले विषय घेणे आले.**

ठराव क्रमांक - ८०     विषय क्रमांक - २
दिनांक - २५/०३/२०१५
सुचक - मा.सविता साळुंके     अनुमोदक – मा.तानाजी खाडे
संदर्भ - मा.सविता साळुंके, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव.

मोरवाडी प्रभाग क्र.२७ मध्ये देवीबाई कापसे उद्यानात महिलांकरीता व्यायाम शाळेचे नियोजन केले आहे. सदर व्यायाम शाळेकरीता महिलांकरीता लागणारे अद्ययावत साहित्य उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ८१     विषय क्रमांक - ३
दिनांक - २५/०३/२०१५
सुचक - मा.तानाजी खाडे     अनुमोदक – मा.सविता साळुंके
संदर्भ - मा.तानाजी खाडे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड मनपा क्रीडा समिती सदस्य, क्रीडा अधिकारी, क्रीडा पत्रकार इ. व्यक्तींना स्पोर्टस् अथोरिटी ऑफ इंडिया, पतियाळा येथे अभ्यास दौरा करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८२     विषय क्रमांक - ४
दिनांक - २५/०३/२०१५
सुचक - मा.तानाजी खाडे     अनुमोदक – मा.सविता साळुंके
संदर्भ - मा.तानाजी खाडे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव.

मा.सभापती, क्रीडा समिती यांचे कार्यालयात सुप्रसिध्द खेळाडूंचे (राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय) विविध खेळांचे छायाचित्र लावणेकामी कोटेशन काढून त्वरित खरेदी करणेस तसेच पिं.चिं.मनपा हद्दीतील खेळाडूंना (हॉकी) सरावासाठी हॉकीस्टीक (ग्रॅफाईट) त्वरित कोटेशन काढून खरेदी करणेस तसेच पिं.चिं.मनपाचे जलतरण तलावावर जीवरक्षक साहित्य खरेदी करणे (लाईफ जॅकेट, स्विमिंग रिंग, बांबू, रस्सी इ.) त्वरित कोटेशन काढून खरेदी करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८३ विषय क्रमांक - ५
दिनांक - २५/०३/२०१५
सुचक - मा.तानाजी खाडे अनुमोदक – मा.सविता साळुंके
संदर्भ - मा.तानाजी खाडे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड मनपा व प्रोफेशनल टेनिस कन्सलटंट प्रा.लि. यांच्या संयुक्त विद्यमाने लॉन टेनिस अकादमी सुरु करणेस व त्या अनुषंगाने अटी व शर्ती निश्चित करण्याची कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८४ विषय क्रमांक - ६
दिनांक - २५/०३/२०१५
सुचक - मा.तानाजी खाडे अनुमोदक – मा.सविता साळुंके
संदर्भ - मा.तानाजी खाडे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड मनपा व धनराज पिल्ले स्पोर्टस् अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने हॉकी अकादमी सुरु करणेस व त्या अनुषंगाने अटी व शर्ती निश्चित करण्याची कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८५ विषय क्रमांक - ७
दिनांक - २५/०३/२०१५
सुचक - मा.तानाजी खाडे अनुमोदक – मा.सविता साळुंके
संदर्भ - मा.तानाजी खाडे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड मनपा व गगन नारंग स्पोर्टस् प्रमोशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शुटिंग अकादमी सुरु करणेस व त्या बाबतच्या अटी व शर्ती निश्चित करुन पुढील कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८६ विषय क्रमांक - ८

दिनांक - २५/०३/२०१५

सुचक - मा.तानाजी खाडे अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ - मा.तानाजी खाडे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड मनपा व संकेत शेट्टी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने बॅडमिंटन अकादमी सुरु करणेस व त्याकामी अटी व शर्ती निश्चित करुन पुढील कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८७ विषय क्रमांक - ९

दिनांक - २५/०३/२०१५

सुचक - मा.तानाजी खाडे अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ - मा.तानाजी खाडे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने खेळाडू दत्तक योजना राबविली जाते. या योजने अंतर्गत हॉकी खेळाडूंना व शालेय हॉकी खेळाडूंना प्रशिक्षण देणेकामी कु.निखत जमालुद्दिन शेख, राहुलनगर से.नं.२२ निगडी यांची हॉकी प्रशिक्षक म्हणून मानधनावर नियुक्ती करणेस मान्यता मिळणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८८ विषय क्रमांक - १०

दिनांक - २५/०३/२०१५

सुचक - मा.तानाजी खाडे अनुमोदक – मा.सविता साळुंके

संदर्भ - मा.तानाजी खाडे, मा.सविता साळुंके यांचा प्रस्ताव.

ब्लेझरची खरेदी यापूर्वी कोटेशन काढून करणेबाबत झालेल्या ठरावानुसार ३० + ३ = ३३ नग मा.अध्यक्ष स्थायी समिती, मा. शिक्षणाधिकारी व मा.सहा.आयुक्त (क्रीडा) यांचेसाठी खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( ननवरे जितेंद्र बाबा )**
**सभापती**
क्रीडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ २७० /२०१५
दिनांक : २६/०३/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.0.152\e\e drive\Nagersachiv1\Krida-14-15\proceeding1_Krida 13.doc